| | | | |
|---|---|---|---|
| दाखल तारीख | ०५ | ०१ | २०२३ |
| नोंदणी तारीख | २० | ०१ | २०२३ |
| निकाल तारीख | ०२ | ०७ | २०२६ |
| कालावधी | **व– ०३** | **म– ०३** | **दि– २८** |

**भाग 'अ'**

| | | |
|---|---|---|
| **MHPU180000612023** | **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, (न्यायालय क्र.२), दौंड यांच्या न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारी : एस.एन. पाटील यांचे समक्ष) | |
| | **नियमित फौजदारी खटला क्र.२९/२०२३** | **नि.क्र.८२** |

| | |
|---|---|
| **न्यायनिर्णय दिनांक** | **०२–०७–२०२६** |
| अपराध क्रमांक **१०७५/२०२०** | पोलिस स्टेशन यवत |

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र सरकार तर्फे,<br>पोलीस ठाणे अधिकारी, यवत,<br>ता. दौंड, जि. पुणे. |
| अभियोग पक्षातर्फे | | श्री.के. के. कौलवार सहायक सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | | **१. नाव – मच्छिंद्र बबन जगताप,**<br>वय – ४७ वर्ष, धंदा– शेती,<br><br>**२. नाव – स्वप्नील मच्छिंद्र जगताप,**<br>वय – २१ वर्ष, धंदा– शेती,<br><br>**३. नाव – रोहन मच्छिंद्र जगताप,**<br>वय – १९ वर्ष, धंदा– शेती,<br><br>**४. नाव – सारीका मच्छिंद्र जगताप,**<br>वय – ४०, धंदा– शेती,<br>**५. नाव – सुप्रिया मच्छिंद्र जगताप,**<br>वय – १९, धंदा– शेती,<br>सर्व रा. भरतगाव, ता. दौंड, जि. पुणे |
| आरोपींतर्फे | | अॅड श्री. आर. के. भिसे |

## भाग 'ब'

| | | |
|---|---|---|
| घटना तारीख | :- | २५.११.२०२० |
| प्रथम खबर तारीख | :- | २६.११.२०२० |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | :- | ०४.०१.२०२३ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | :- | ११.१२.२०२४ |
| पुरावा सुरू झालेली तारीख | :- | ११.१२.२०२४ |
| न्यायनिर्णयाकरीता राखीव ठेवलेली तारीख | :- | ०२.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | :- | ०२.०७.२०२६ |
| शिक्षा सुनावण्याकरीता नेमलेली तारीख | :- | -- |

## आरोपींचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमानत मिळाल्याची तारीख | ठेवलेले दोषारोपाची गुन्हा कलम | आरोपीची निर्दोष मुक्तता किंवा शिक्षा | सुनावलेली शिक्षा | फौ.प्र.सं. ४२८ च्या अनुषंगाने आरोपींनी संपरीक्षेदरम्यान आरोपी जेलमध्ये असलेले कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मच्छिंद्र बबन जगताप | ०२.१२.२०२२ | ०२.१२.२०२२ | कलम ३२४, ३२५, १४३, १४७, ५०४, ५०६ सह ३४ भा.दं.वि. | **निर्दोष मुक्तता** | - | - |
| २. | स्वप्नील मच्छिंद्र जगताप | ०२.१२.२०२२ | ०२.१२.२०२२ | कलम ३२४, ३२५, १४३, १४७, ५०४, ५०६ सह ३४ भा.दं.वि. | **निर्दोष मुक्तता** | - | - |
| ३. | रोहन मच्छिंद्र जगताप | ०२.१२.२०२२ | ०२.१२.२०२२ | कलम ३२४, ३२५, १४३, १४७, ५०४, ५०६ सह ३४ भा.दं.वि. | **निर्दोष मुक्तता** | - | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | सारीका मच्छिंद्र जगताप | ०२.१२.२०२२ | ०२.१२.२०२२ | कलम ३२४, ३२५, १४३, १४७, ५०४, ५०६ सह ३४ भा.दं.वि. | **निर्दोष मुक्तता** | – | – |
| ५. | सुप्रिया मच्छिंद्र जगताप | ०२.१२.२०२२ | ०२.१२.२०२२ | कलम ३२४, ३२५, १४३, १४७, ५०४, ५०६ सह ३४ भा.दं.वि. | **निर्दोष मुक्तता** | | |

## भाग 'क'

**अ. अभियोग पक्ष साक्षदार :–**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरूप** |
|---|---|---|
| सा.क्र.१ | अमर पोपट जगताप | फिर्यादी |
| सा.क्र.२ | अनिता पोपट जगताप | जखमी |

**ब– बचाव पक्ष साक्षदार :–**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

**क– न्यायालयामार्फत साक्षदार :–**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय निशाणी**

**अ– अभियोग पक्षाचे निशाणी :**

| **अ–क्र–** | **निशाणी क्रमांक** | **तपशील** |
|---|---|---|
| १. | ७९ | फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| २. | ८० | जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ३. | ८१ | घटनास्थळ पंचनामा |

**ब– बचाव पक्षाचे निशाणी :**

| **अ–क्र–** | **निशाणी क्रमांक** | **तपशील** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| – | – | – |

**क– न्यायालयामार्फत निशाणी :**

| अ–क्र– | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**ड– मुद्देमाल :**

| अ–क्र– | मुद्देमाल क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | पोलिस ठाणे मालमत्ता क्र.९८/२०२२ | एक लाकडी काठी ज्याची लांबी २० इंच व व्यास ३.५ इंच, एक लाकडी काठी ज्याची लांबी २१ इंच व व्यास ४ इंच, लोखंडी गज ज्याची लांबी १६ इंच व्यास १.५ इंच |

## न्यायनिर्णय
## (अधिघोषित दिनांक ०२ जुलै, २०२६)

फिर्यादी अमर जगताप यांच्या फिर्यादवरून आरोपींविरूध्द भारतीय दंड संहिता, १९६० (यापुढे भा.द.वि. असे संबोधण्यात येईल) कलम ३२४, ३२५, १४३, १४७, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये प्रस्तुत खटला दाखल केला आहे.

**खटल्याची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

**०२.** दि.२५.११.२०२० रात्री ०९.०० वाजन्याच्या सुमारास मौजे भरतगाव, ता. दौंड येथे फिर्यादीचे चुलते बबन बाळासो जगताप यांच्या घरासमोर तंटामुक्त अध्यक्ष व सदस्यांच्या समक्ष फिर्यादीव आरोपी यांच्यात शेतीचे वहिवाटीवरून चालु असलेला वाद मिटविण्यासाठी बैठक बसविली होती. सदर बैठक चालू असताना फिर्यादीचा चुलत भाऊ मच्छिंद्र जगताप म्हणाला की, ‘ती जमीन आम्ही वहिवाटनार तुम्ही जमीनीत यायचे नाही' त्यावर फिर्यादी म्हणाला की, 'आपला कोर्टात दावा दाखल आहे. कोर्टाचा निकाल तुझ्या बाजुने लागल्यास तु जमीन वहिवाट' असे म्हणताच, आरोपीने फिर्यादी व त्याच्या आईला शिवीगाळ दमदाटी करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच, आरोपी स्वप्नील, मच्छिंद्र व रोहण यांनी फिर्यादीला लाकडाने पाठीवर मारहाण केली. तसेच, फिर्यादीची आई

अनिता जगताप रोहन याने लोखंडी गजाने नाकावर मारून दुखापत केली. त्यानंतर फिर्यादीने सदर आरोपींविरुध्द यवत पोलिस स्टेशनला सदर घटनेची फिर्याद दिली.

०३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादवरून पोलीसांनी आरोपींविरूध्द गुन्हा क्र.१०७५/२०२० भा.दं.वि. कलम ३२४, ३२५, १४३, १४७, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये नोंदविला. त्यानंतर तपासी अंमलदारांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. संबंधीत साक्षदारांचे तपास टिपण नोंदवले आणि चौकशीचे आवश्यक कामकाज पुर्ण झाल्यावर तपासाअंती आरोपींविरुध्द पुरावा आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

०४. सदर आरोपींविरूध्द निशाणी क्र.४४ प्रमाणे कलम ३२४, ३२५, १४३, १४७, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये भारतीय दंड संहिता अंतर्गत दोषारोप निश्चीत करण्यात आले. आरोपींना त्यांचेविरुध्द लावण्यात आलेले आरोप वाचुन दाखवले असता ते त्यांनी नाकारले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

०५. अभिलेखावरील दोन्ही पक्षांच्या पुराव्यावरुन आणि युक्तिवादावरुन प्रस्तुत खटल्याचे निकालाकरीता पुढील मुद्दे माझे समक्ष उपस्थित होतात. त्या मुद्यांबाबतचे निष्कर्ष मुद्यांचे समक्ष, सकारण मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे:–

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| **१.** दि.२५/११/२०२० रोजी रात्री ९.०० वा. मौजे भरतगाव, ता. दौंड, जि. पुणे गावच्या हद्दीत फिर्यादी अमर पोपट जगताप यांचे चुलते बबन बाळासो जगताप यांच्या घरासमोर शेत वहिवाटीचा वाद मिटवण्यासाठी बैठक चालु असताना आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस लाकडी काठीने पाठीत आणि त्यांची आई अनिता पोपट जगताप यांना लोखंडी गजाने नाकावर मारहाण केली, इच्छापुर्वक दुखापत पोहचवली व त्याव्दारे भा.दं.सं. १८६० चे कलम ३२४ सह ३४ चा शिक्षापात्र अपराध केला, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | **नकारार्थी...** |

| | |
|---|---|
| **२.** आरोपींनी वर नमुद तारीख, वेळ ठिकाण व कारणास्तव संगनमत करुन लोखंडी गजाने फिर्यादीची आई नामे अनिता पोपट जगताप यांच्या नाकावर जबर मारहाण करुन त्यांना इच्छापुर्वक जबर दुखापत पोहचवली व त्याव्दारे भा.दं.सं. १८६० चे कलम ३२५ सह ३४ चा शिक्षापात्र अपराध केला, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय? | **नकारार्थी...** |
| **३.** आरोपींनी वर नमुद तारीख, वेळ ठिकाण व कारणास्तव संगनमत करुन समान उदिष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव केला व त्याव्दारे भा.दं.सं. १८६० चे कलम १४३ चा शिक्षापात्र अपराध केला, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | **नकारार्थी...** |
| **४.** आरोपींनी वर नमुद तारीख, वेळ ठिकाण व घटनास्थळी संगनमत करुन सदर ठिकाणी बेकायदेशीर जमाव करुन सदर ठिकाणी दंगा केला व त्याव्दारे भा.दं.सं. १८६० चे कलम १४७ सह ३४ चा शिक्षापात्र अपराध केला, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | **नकारार्थी...** |
| **५.** आरोपींनी वर नमुद तारीख, वेळ ठिकाण व कारणास्तव संगनमत करुन फिर्यादीस व त्यांच्या आईला शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभणामुळे त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्या मागे उद्देश ठेवला व त्याव्दारे भा.दं.सं. १८६० चे कलम ५०४ सह ३४ चा शिक्षापात्र अपराध केला, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | **नकारार्थी...** |
| **६.** आरोपींनी वर नमुद तारीख, वेळ, ठिकाण व कारणास्तव घटनास्थळी फिर्यादी व त्यांच्या आईला दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्याव्दारे भा.दं.सं. १८६० चे कलम ५०६ सह ३४ चा शिक्षापात्र अपराध केला, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | **नकारार्थी...** |
| **७.** आदेश काय ? | **... अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

०६. मुद्दा क्र.१ ते ६ हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे विवेचन एकत्रीत करण्यात येते. अभियोग पक्षाने आरोपींवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी खटल्याच्या पुष्टयार्थ अभियोग पक्षाने एकुण दोन साक्षीदारांना तपासले. साक्षीदार क्र.१ अमर पोपट जगताप (फिर्यादी) यांना नि.क्र.७६ वर आणि साक्षीदार क्र.२ अनिता पोपट जगताप (जखमी) यांना नि.क्र.७७ वर तपासले.

**मुद्दा क्र. ०१ ते ०६ करीता :**

०७. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ अमर पोपट जगताप यांचे साक्षीत असे आले आहे की, ते आरोपींना ओळखत असुन दि.२५.११.२०२० रोजी त्यांच्यामध्ये व आरोपींमध्ये किरकोळ शाब्दीक भांडण झाले होते. परंतू, त्यांना व त्यांच्या आईला आरोपींनी मारहाण केली नसल्याचे कथन केले. पोलिस स्टेशनला त्यांनी फिर्याद दिली असुन त्यावर त्यांनी सही केल्याचे नमुद केले. परंतु, त्यातील मजकुराबाबत काही माहिती नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे त्यांना फितुर घोषित करुन अभियोग पक्षातर्फे त्याचा उलटतपास घेण्यात आला असता त्यांनी उलटतपासात अभियोग पक्षास सहाय्यक ठरेल अशी कोणतीही कबुली दिलेली नाही. सदर साक्षीदाराचा आरोपींतर्फे उलटतपास त्यांचे विधिज्ञांनी नाकारला.

०८. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ अनिता पोपट जगताप यांचे साक्षीत असे आले आहे की, घटनेदिवशी त्यांना आरोपीने लोखंडी जगाने मारहाण केली नव्हती. तसेच, आरोपींनी त्यांचा मुलगा म्हणजे सा.क्र.१ याला देखील लाकडाने पाठीवर दुखापत केली नाही. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे त्याला फितुर घोषित करुन अभियोग पक्षातर्फे त्याचा उलटतपास घेण्यात आला असता त्याने उलटतपासात अभियोग पक्षास सहाय्यक ठरेल अशी कोणतीही कबुली दिलेली नाही. सदर साक्षीदाराचा

आरोपींतर्फे उलटतपास त्यांचे विधिज्ञांनी नाकारला.

**०९.** साक्षीदार क्र.१, २ व आरोपींनी दाखल केलेल्या आपसी समझोता पुरसीस व अर्ज (नि.क्र.७४ व ७५) वरून त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असुन त्यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध निर्माण झाल्याचे दिसुन येते. सदर प्रकरण पुढे चालवायचे नसुन त्यांच्यामध्ये कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याचे दिसुन येते. प्रकरणात फिर्यादी व जखमी साक्षीदार हे फितुर झाल्यामुळे इतर साक्षीदारांना समन्स काढुन काहीही उपयोग होणार नसल्याने अभीयोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**१०.** फिर्यादीस व जखमी साक्षीदारास आरोपींनी लाकडी दांडक्याने व लोखंडी गजाने मारहाण केल्याबाबत काहीही सांगीतलेले नाही व त्या अनुशंगाने कोणताही पुरावा खटल्याच्या अभिलेखास आलेला नाही. जरी प्रकरणात आरोपींतर्फे जखमी फिर्यादीचे व साक्षीदाराचे वैद्यकिय प्रमाणपत्र कबुल करण्यात आले असले तरी जखमी साक्षीदार अभियोग पक्षास फितुर झाल्याने त्यांना झालेल्या जखमा या आरोपींनी केलेल्या मारहाणीत झाल्या, असे म्हणता येणार नाही. याव्यतीरिक्त खटल्याच्या अभिलेखास इतर पुरावा आलेला नाही. प्रकरणात जरी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले असले तरी ते योग्य त्या साक्षीदारामार्फत शाबीत होणे गरजेचे होते. त्यामुळे त्याचा उपयोग अभीयोग पक्षास होणार नाही.

**११.** आरोपींविरूध्द खटल्याच्या अनुशंगाने अभिलेखावर सबळ पुरावा आला नसल्यामुळे आरोपींचा फौजदारी प्रकिया संहिता १९७३ च्या कलम ३१३ अन्वयेचा जबाब वगळण्यात आलेला आहे.

**१२.** कोणत्याही खटल्यात आरोपींविरूद्ध गुन्हा सिद्ध होणेसाठी फिर्यादीची, जखमीची साक्ष अत्यंत महत्वाची असते. परंतु, प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी/जखमी साक्षीदार यांची साक्ष आरोपींविरूध्द दोष सिध्द करण्यासाठी पुरेशी नाही. प्रस्तुत प्रकरणात आरोपींना

दोषी ठरविण्यासाठी आरोपींनी फिर्यादीस व त्याच्या आईला लाकडी काठीने व लोखंडी गजाने इच्छापूर्वक जबर दुखापत पोहचविल्याचा तसेच इच्छापुर्वक साधी दुखापत केल्याचा पुरावा न्यायालयापुढे आलेला नाही. अभियोग पक्षातर्फे आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपूर्वक अपमान केला तसेच त्यांना प्रक्षोभित करुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा, अशा उद्देशाने अपमान केला या अनुषंगाने कोणताही पुरावा खटल्याच्या अभिलेखावर आलेला नाही, म्हणुन मुद्दा क्रमांक १ ते ६ चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**मुद्दा क्रमांक ७ करीता :**

**१३.** मुद्दा क्र.१ ते ६ च्या नकारार्थी निष्कर्षावरुन आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. त्याचप्रमाणे या खटल्याचे अपील झाल्यास आरोपींची उपस्थिती मा. वरिष्ठ न्यायालयात राखण्याकरीता त्यांचेकडुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे जामिन बंधपत्र घेणे योग्य होईल. मुद्देमालातील एक लाकडी काठी ज्याची लांबी २० इंच व व्यास ३.५ इंच, एक लाकडी काठी ज्याची लांबी २१ इंच व व्यास ४ इंच, लोखंडी गज ज्याची लांबी १६ इंच व्यास १.५ इंच असलेले मूल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर नष्ट करणे न्यायोचीत राहील. करीता, मुद्दा क्र.७ च्या उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## :: आदेश ::

**१.** आरोपी क्र.१ मच्छिंद्र बबन जगताप, आरोपी क्र.२ स्वप्नील मच्छिंद्र जगताप, आरोपी क्र.३ रोहन मच्छिंद्र जगताप, आरोपी क्र.४ सारीका मच्छिंद्र जगताप व आरोपी क्र.५ सुप्रिया मच्छिंद्र जगताप यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये कलम ३२४, ३२५, १४३, १४७, ५०४, ५०६ सह ३४ भा.दं.वि. या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. गुन्हयातील मुद्देमाल एक लाकडी काठी ज्याची लांबी २० इंच व व्यास ३.५ इंच, एक लाकडी काठी ज्याची लांबी २१ इंच व व्यास ४ इंच, लोखंडी गज ज्याची लांबी १६ इंच व्यास १.५ इंच मूल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर नष्ट करावे.

३. आरोपींचे जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

४. आरोपींना असेही निर्देश देण्यात येते की, त्यांनी फौ. प्र. सं. कलम ४३७ (अ) पुर्ततेचे कामी सहा महिन्याच्या कालावधीकरिता त्यांचे प्रत्येकी वैयक्तिक बंधपत्र रूपये १५,०००/– सादर करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2026.07.02 17:08:20 +0530

दौंड.
दिनांकः०२/०७/२०२६

**(एस.एन. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
फौजदारी न्यायालय क्र.२, दौंड

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original judgment"

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Vaibhav D. Padman |
| Court name | : | Hon'ble Shri. S.N. Patil<br>J.M.F.C., Court No.2, Daund |
| Judgment signed by<br>Presiding Officer on | : | 02.07.2026 |
| Judgment uploaded on | : | 02.07.2026 |